| | |
|---|---|
| MHKO110004972023 | **नियमित दिवाणी दावा क्र. ७१/२०२३ मधील निशाणी क्र. १६ वरील आदेश** **(श्रीमती संगीता काकासो माने विरुध्द श्री .प्रशांत धोंडीराम पाटील वगैरे )** |

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला " विना कैफियत " आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले . दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की , प्रस्तुत दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर कामी यातील प्रतिवादी यांना दिनांक १७.०४.२०२३ रोजी समन्स व नोटीस लागू झालेली होती. त्याप्रमाणे दिनांक १७.०७.२०२३ पर्यंत ९० दिवसांचे आत कैफियत व म्हणणे देणे बंधनकारक होते. परंतू त्यांना कैफियत व म्हणणे देणेकामी आवश्यक ती कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे मुदतीत दाखल करता आले नाही. सबब त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०४. वादी यांनी सदरहू अर्जाच्या पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व मजकुर नाकारला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांनी वादी यांना केवळ त्रास देणेच्या उददेशाने जाणीवपूर्वक म्हणणे व कैफियत देणेस विलंब केलेला आहे . त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे . याउपर अर्ज मंजूर करणेचा झाल्यास दंड करणेची विनंती केलेल आहे.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, प्रस्तुत प्रतिवादींविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करणेत आलेला नाही. परंतू दिवाणी प्रक्रिया संहितेतील तरतूदीनुसार समन्स लागू झाल्यापासून ९० दिवसांचे आत प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. त्यामुळे कैफियत दाखल करण्यापूर्वी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाईकरीता दाखल केला आहे . दाव्याचे स्वरुप पाहता दावा

गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांनी आपली कैफियत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांनी केलेल्या उशीरासाठी काही अंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**– <u>आ दे श</u> –**

१) प्रतिवादी यांचा (निशाणी क्र.१६) अर्ज, वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/–(अक्षरी रुपये दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2023.08.19 11:02:49 +0530

ठिकाण – पेठ वडगांव ( एस.डी.शिरसाट )

दिनांक – १७.०८.२०२३ ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर. पेठवडगांव